# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-२५/२०२५** **दिनांक- १७/०१/२०२५**

## प्रेस नोट

### नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक I २६७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ),३३१(३) प्रमाणे या गुन्हयाचे उत्कृष्ट कामगिरीबाबत...

फिर्यादी नामे श्री दिव्येश रमेश म्हात्रे वय २५ वर्ष,व्यवसाय - नोकरी, राहणार नाळा पडई, दत्त मंदिर जवळ, नालासोपारा पश्चिम, ता.वसई,जि.पालघर हे व त्यांचे घरातील सर्व सदस्य असे दि.०८/०७/२०२४ रोजी सकाळी ०९.३० वा पासुन ते दुपारी ०४.०० वाजताचे दरम्यान कामानिमीत्त बाहेर गेले असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे राहते घराचे लॉक असलेले कुलुप कशाचे तरी सहाय्याने तोडून घरात प्रवेश करुन घरातील बेडरुममधील लोखंडी कपाटातील सुमारे २५,६६,५१८/- रुपये किमतीचे ( ६२० ग्रॅम वजनाचे ) सोन्याचे दागिने फिर्यादीचे संमती शिवाय लबाडीचे इरादयाने चोरी करुन चोरुन नेले असल्याने त्यांनी तात्काळ नालासोपारा पोलीस ठाणे येथे येवुन तक्रार दिलेवरुन नालासोपारा पोलीस ठाणेस गु.रजि.क्रं. ४३६/२०२४ भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयामध्ये फिर्यादी यांचे मोठया प्रमाणात दागीने चोरी झालेले असल्याने परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचा तपास सुरु करुन घटनास्थळावरील प्राप्त सी.सी.टी.व्ही फुटेज पाहुन अनोळखी चोरटयांचा शोध सुरु केला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी हे घटनास्थळावर ऑटो-रिक्षाने आल्याचे दिसुन आल्याने सदर ऑटो-रिक्षाचा सीसीटीव्ही कॅमेऱ्यामार्फत शोध घेवुन पाठलाग सुरु केला.संपुर्ण रात्रभर ठिकठिकाणच्या सुमारे ८० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पडताळणी केल्यानंतर दिनांक १०/०७/२०२४ रोजी सदरची ऑटो-रिक्षा ही काल्हेर,ता.भिवंडी,जि.ठाणे येथे मिळुन आली.त्यावरुन ऑटोरिक्षाचा मालक योगेश गणपत गोविंद, वय ३१ वर्षे, धंदा- रिक्षा चालक, रा.ठी. रुम नं.०६, तळमजला,सचिन म्हात्रे सोसायटी,साई बाबा मंदीर समोर,काल्हेर,ता.भिवंडी,जि.ठाणे यास शोधुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने गुन्हयाची कबुली देवुन सदर गुन्हा त्याने व त्याचे इतर ०२ साथीदार नामे १) रिझवान अब्दुलमन्नान अन्सारी वय ३० वर्षे रा.ठी. सद्द बेरखा ता- धामपुर जि- बिजनोर, उत्तरप्रदेश व २) मोझम अलीहुसेन शेख वय २९ वर्षे, धंदा- चोरी करणे रा.ठी. मुपो पिंपळ मोहल्ला, सावरडे, मोडक चाळ, ता- चिपळून जि- रत्नागिरी सध्याः- कोळशेत रोड, हनुमान मंदिराच्या मागे, ठाणे पश्चिम यांनी मिळुन केल्याचे सांगीतले.तसेच त्याचे दोन्ही साथीदार यांनी गुन्हयातील चोरुन नेलेले सोन्याचे दागीने हे दिल्ली,उत्तरप्रदेश येथे विक्री करीता घेवुन गेल्याचे सांगितले.त्यावर लागलीच गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार हे दिल्ली,उत्तरप्रदेशकडे रवाना झाले.त्यानंतर मोबाईलचे तांत्रीक तपासावरुन मोझम अलीहुसेन शेख यास स्योहारा,ता.धामपुर, जि.बिजनोर,राज्य उत्तरप्रदेश येथुन दिनांक १२/०७/२०२४ ताब्यात घेण्यात आले होते.परंतु मुख्य

आरोपीत नामे रिझवान मन्नान अन्सारी हा गेल्या ०६ महिन्यापासून गुन्हयातील सर्व सोन्याचे दागीने घेवुन परागंदा झाला होता.

गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर मुख्य आरोपीत नामे रिझवान अब्दुलमन्नान अन्सारी याचा वेळोवेळी त्याचे राहते गावी जावुन शोध घेतला असता तो मिळुन येत नव्हता. तसेच अटक आरोपीत रिजवान अन्सारी हा दाढी व केस वाढवून तसेच कानाला मफलर गुंडाळून तो आपले अस्तीत्व लपवून नोयडा, दिल्ली येथे रिक्षा चालविण्याचे काम करीत होता.गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपासात सातत्य ठेवुन केलेल्या अथक प्रयत्नानंतर आरोपीताच्या नातेवाईकांचे मोबाईल नंबरचे तांत्रीक तपासावरुन मोठया शिताफिने त्यास दिनांक ०३/०१/२०२५ रोजी नोयडा,दिल्ली येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली.आरोपीत याचेकडे पोलीस कोठडी दरम्यान कसुन तपास केला असता आरोपीताने गुन्हयाची कबुली दिल्याने त्याचेकडुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागीन्यांमधुन सुमारे ११,२५,०००/- रुपये किंमतीचे ( १५० ग्रॅम वजनाचे ) सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आले आहेत.उर्वरीत दागीन्यांचा तपास चालु आहे तसेच आरोपीत याचेकडुन आणखी ०२ गुन्हे उघड झाले आहेत.

**आरोपीत याचेकडुन उघडकीस आणलेल्या गून्हयाची माहिती खालीलप्रमाणे.**

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१. | नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २६७/२०२४ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०५(अ),३३१(३) अंतर्गत |
| ०२. | नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २२१/२०२४ भादविसं कलम ४५४,३८० अंतर्गत |
| ०३. | अर्नाळा पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २०९/२०२४ भादविसं कलम ३८० अंतर्गत |

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय - पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे - अपर पोलीस आयुक्त, श्री. जयंत बजबळे - पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३ विरार, श्री. विजय लगारे - सहा. पो.आयुक्त नालासोपारा, श्री. विशाल वळवी - वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हे प्रगटीकरण शाखेचे सपोनि/राजेंद्र चंदनकर, पोउपनि/योगेश मोरे, पोहवा/प्रशांत साळुंके, पोना/अमोल तटकरे, पोशि/कल्याण बाचकर, पोशि/राजेश नाटुलकर, पोशि/प्रेम घोडेराव, पोशि/ प्रताप शिंदे, पोशि / बाबा बनसोडे व पोशि / सोहेल शेख (पोलीस उप आयुक्त कार्यालय , परिमंडळ-०३ विरार ) यांनी केलेली आहे.

-----oooo----